# स्वातंत्र्यलढ्यातील लढवय्ये
## सरदार अजितसिंह आणि
## मदनलाल धिंग्रा

पहिली आवृत्ती

संकलक
चंद्रकांत शहासने
(देशभक्तकोशकार)
मो.क्र. - ९८८१३७३५८५

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या सौजन्याने

ही पुस्तिका कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या राष्ट्रभक्ती पर्यावरण आणि आरोग्य साक्षरता अभियानअंतर्गत प्रकाशित केली.

| | |
|---|---|
| पुस्तकाचे नाव | : स्वातंत्र्यलढ्यातील लढवय्ये<br>सरदार अजितसिंह आणि मदनलाल धिंग्रा |
| संकलक | : चंद्रकांत शहासने (देशभक्तकोशकार) पुणे<br>मो.क्र. – ९८८१३ ७३५८५ |
| प्रकाशक | : बहुजन साहित्यधारा, पुणे<br>११ ए, राहुल कॉम्प्लेक्स,<br>चौथा मजला, पौड रोड, पुणे.<br>दुरध्वनी : ९८८१३७३५८५<br>हक्क प्रकाशकाचे स्वाधीन. |
| प्रकाशन दिनांक | : २५ डिसेंबर २०२२ पहिली आवृत्ती |
| मुद्रक | : श्री वेंकटेश पब्लिकेशन, पुणे<br>हिंगणे खुर्द, सिंहगड रोड. मो. क्र. ८२३७८ ९३३४७ |
| पुस्तकाचे हक्क | : ॲड. नंदिनी शहासने |

ही पुस्तिका कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या राष्ट्रभक्ती पर्यावरण आणि आरोग्य साक्षरता अभियानअंतर्गत प्रकाशित केली.

| | |
|---|---|
| मूल्य | : रूपये ३०/– |
| संपर्क | : श्री. हेमंत प्रभाकर आळवे, ठाणे<br>मो. : ९३२२२६९७२१<br>श्री. अशोक जनार्दन फडणीस, मेणोली–वाई<br>९८५०५ ०९४१६<br>श्री. भानुदास सोपान पायगुडे, धनकवडी–पुणे<br>९८५०३५१०३५ |

Or Pay to VPA

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणे या संस्थेस दिलेल्या देणग्या आयकर माफीस प्राप्त आहेत.

No.: THN/C.I.T.II/Tech/80G/104/2010-11/1479 Dt: 21/09/2010



# क्रांतीकारी सरदार अजितसिंह

**सरदार अजितसिंगाचा वारसाच एका त्यागी घराण्यातला. स्वातंत्र्याविरुद्ध लढण्याचे बाळकडू त्यांना त्यांच्या वडिलांपासून मिळाले. हयातभर त्यांनी या देशासाठी संपूर्ण जगभर हिंडून, स्वातंत्र्यासाठी अथक प्रयत्न केले. त्यांच्या सुदैवाने त्यांना हयातीत स्वातंत्र्य पहायला मिळाले. त्यांचे दुर्दैव त्यांना देशाची फाळणी पहावी लागली. हा धक्का त्यांना सहन झाला नाही. त्यांनी भारत स्वतंत्र झाला त्याच रात्री प्राण सोडले.**

१५ ऑगस्ट १९४७ चा दिवस, देशभर स्वातंत्र्याचा आनंद साजरा होत होता. डलहौसी येथील एका खोलीत रुग्णशय्येवर भगतसिंहांचे चुलते सरदार अजितसिंह झोपलेले होते. भारताच्या स्वातंत्र्यासाठी उणीपुरी सदतीस वर्षे ज्यांनी विदेशातून प्रयत्न केले त्या महान क्रांतिकारकाचे लंडनहून भारतात काही दिवसापूर्वीच आगमन झाले होते.

१४ ऑगस्टच्या मध्यरात्रीच त्यांनी स्वातंत्र्याची घोषणा व त्याचबरोबर भारताच्या फाळणीचे वृत्त ऐकले. त्यांच्या मनाला जबरदस्त धक्का बसला. भारताला गुलामगिरीच्या बेडीतून सोडवण्यासाठी सशस्त्र क्रांतिद्वारे ज्यांनी प्रयत्न केले त्या भारतमाता सोसायटीच्या संस्थापकाला आपल्या प्रिय भारतमातेचे तुकडे झालेले ऐकवले नाहीत. ज्यांनी आपल्या आयुष्यातील तारुण्याची वर्षे

त्यासाठी उधळली. आपल्या प्रिय पत्नीपासून दूर राहिले. त्यांचे स्वप्न आज साकार होत होते, पण त्याला फाळणीचा कलंक लागून.

**''न जवाहर देख रहा है, न जिन्ना, दोनो तरफ खून की नदियाँ वह जाएगी। मै भला मेरी माँ के टुकडे होते हुए कैसे देख सकूँगा?''** सरदार अजितसिंह खोल आवाजात म्हणाले, डॉक्टरांनी त्यांची नाडी पाहून म्हटले, ''सरदार साहेब, आपली प्रकृती ठीक आहे, तुम्हाला काहीही होणार नाही. मन आनंदी ठेवा.'' अजितसिंहानी आपली पत्नी व अन्य सदस्य बोलावले. ''मी माझ्या डोळ्याने या देशातून इंग्रजांना पळून जाताना पहिले, पण माझ्या डोळ्यांना देशाचेझालेले तुकडे पाहणे कदापि जमणार नाहीत. माझ्या मित्रांना माझा अखेरचा संदेश पोहोचवा.'' शोकाकूल झालेल्या हरनाम कौर यांच्या चरणांना स्पर्श करून ते म्हणाले, ''मी तुझ्याशी लग्न केले, तुला सुखी ठेवणे हा माझा धर्म होता, कर्तव्य होते, पण मी भारतमातेच्या सेवेत रमलो आणि तुला अंतर दिले. मला क्षमा कर.''

आपल्या देशभक्त पतीवर अपार प्रेम करणाऱ्या कौर यांच्या मुखातून एक शब्दही फुटत नव्हता. त्या काही बोलणार तोच 'जय हिंद' असे म्हणून अजितसिंहांनी डोळे मिटले, ते परत न उघडण्यासाठीच. त्यांचे ते शब्द अखेरचे ठरले.

भगतसिंह या पुतण्याला आणि साऱ्याच भारतीय युवकांना क्रांतिकार्याचा वारसा देणारा महावृक्ष उन्मळून पडला. 'स्वातंत्र्य मिळाले' हे ऐकण्यासाठीच जणू त्यांनी यमदूतांना थोपवून ठेवले होते. १५ ऑगस्ट हा भारताच्या इतिहासात सुवर्णदिन ठरला. त्याचवेळी अखंड भारताचा पुरस्कार करणाऱ्या सरदार अजितसिंहांनी स्मृती पुण्यतिथीच्या रूपाने इतिहासात नोंदणी केली.

क्रांतिवीर सरदार अजितसिंहांचा जन्म खटकउला (जि. जालंदर) येथे २३ फेब्रुवारी १८८१ रोजी झाला. बालपणातच त्यांच्या मनावर देशभक्तीचे संस्कार

झाले. माता जया कौर व पिता सरदार अर्जुनसिंह दोघांनीही आपल्या सर्वच मुलांवर राष्ट्रप्रेमाचे संस्कार केले. पण अजितसिंहांच्या अतिसंवेदनक्षम मनात ते बीज लवकर अंकुरले, फोफावले.

अजितसिंहांची बारसच्या हिंदू विश्वविद्यालयात संस्कृत शिकण्याची अतिशय इच्छा होती परंतु मोठ्या बंधूंच्या इच्छेस मान देऊन ते बरेली येथे लॉ कॉलेजमध्ये शिक्षणासाठी गेले. पुढे प्रकृती बरी नसल्याने लाहोरला परत येऊन डी. ए. बी. कॉलेजात नाव घातले. कॉलेजच्या होस्टेलचे सुपरिटेंडेट लाला लजपतराय होते. त्यांच्या सहवासातच त्यांनी राजकीय व सामाजिक कार्याचे धडे गिरवले.

एकदा लाहोर येथे गोपाल कृष्ण गोखल्यांचे त्यांनी भाषण ऐकले त्यावर त्यांची अशी प्रतिक्रिया झाली की ''अशा चमकदार भाषणांनी देशाला स्वातंत्र्य मिळणे अशक्य आहे. त्याचबरोबरच परकीय सत्तेशी संघर्ष करणे आवश्यक आहे.''

सन १९०५ ला ब्रिटिश सरकारने बंगालची फाळणी केली. सारा देश या निर्णयाने प्रक्षुब्ध झाला. १९०६ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन कलकत्यात भरले. त्याचे अध्यक्षपद दादाभाई नौरोजीकडे होते. आपले बंधू किशनसिंह व अन्य मित्रांसह सरदार अजितसिंह या अधिवेशनास उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या दादाभाई नौरोजी व टिळकांच्या भाषणाने अजितसिंह प्रभावित झाले. त्यांनी व त्यांच्या साथीदारांनी पंजाबात उघडपणे सशस्त्र क्रांती करण्याचा संकल्प केला.

याच काळात ब्रिटिशांनी शेतकऱ्यांवर अनेक प्रतिबंध व जाचक कर लादले होते. शेतकऱ्यांचे होणारे शोषण बघून अजितसिंहांनी 'भारतमाता सोसायटी'ची स्थापना करून या अन्यायाला वाचा फोडली. या संघटनेत सूफी अंबाप्रसाद, लाला केदारनाथ सहगल, लालचंद फलक, मेहता नंदकिशोर यांच्याबरोबरच सरदार किशनसिंह व सरदार स्वर्णसिंह हे अजितसिंहांचे दोन बंधू होते. अनेक

गावांतून, शहरांमधून आपल्या भाषणातून ते ब्रिटिशांविरुद्ध आवाज उठवीत. भारताला गुलामगिरीत ठेवणाऱ्या जुलमी सत्तेला उलवून टाकण्यासाठी तरुणांनी प्रयत्न करायला हवेत असे सांगत. त्यांच्या भाषणांनी जनतेतही ब्रिटिशांविरुद्ध बंड करण्याची इच्छा बळावत गेली. २२ मार्च १९०७ मध्ये लाथलपूर येथे भारतमाता सोसायटीची विराट सभा भरली. त्यावेळी श्री. बांकेदयाल यांनी आपली 'पगड़ी संभाल जट्टा' कविता ऐकवली. पुढे हेच नाव आंदोलनास पडले.

अजितसिंहांच्या भाषणाने व शेतकरी आंदोलनाने लोकांमध्येही क्रांतीची ज्वाला भडकत गेली. १० मे १९०७ ला चारशे सशस्त्र पोलिसांनी अजितसिंहांच्या निवासस्थानास गराडा घालून त्यांना गिरफ्तार केले. अजितसिंहांना ब्रिटिश किती खतरनाक समजत होते हे शिपायांच्या संख्येवरून समजून येते.

सरदार अजितसिंह व लाला लजपतराय यांना मंडालेच्या तुरुंगात राजकीय कैदी म्हणून ठेवण्यात आले. काही महिन्यांनी गुन्हा शाबित न झाल्याने त्यांची मुक्तता करण्यात आली.

**१९०७ च्या सुरत काँग्रेसमध्ये भाग घेण्यासाठी अजितसिंह आपले बंधू किशनसिंह यांच्यासह खास लोकमान्य टिळकांच्या निमंत्रणावरून गेले. आपल्या भाषणात टिळक म्हणाले, ''सरदार अजितसिंह हे व्यक्तिमत्व इतके प्रभावी आहे की, भारत स्वतंत्र झाल्यावर त्यांनाच राष्ट्रपतीपदाचा बहुमान द्यावा लागेल.'' टिळकांनी अजितसिंहांच्या मस्तकावर मुकूट ठेवून त्यांचा गौरव केला.**

सुरतवरून परत येताच अजितसिंहांनी 'भारतमाता सोसायटी' संघटना करण्याचे प्रयत्न सुरू केले, त्यांनी 'पेशवा' नावाने पत्रक सुरू केले परंतु त्याला प्रतिबंध केला जाताच ते अन्य नावाने छापण्यात येऊ लागले.

पंजाबचा गव्हर्नर यांनी सरकारला 'भारतमंत्री मोले' यांना कळवले की,

**''लाला लजपतराय व सरदार अजितसिंह यांना कैद केल्याशिवाय किसान आंदोलन दबले जाणार नाही. भारतीय सेनेत बंडाची फूस देणारे साहित्य वाटले जाते. त्यामुळे १८५७ च्या बंडाची पुनरावृत्ती होण्याची शक्यता आहे.''** अजितसिंहांविरुद्ध वॉरंट काढले गेले. त्यांच्यावर असे आरोप ठेवण्यात आले की त्यामुळे त्यांना फाशीचीच शिक्षा व्हावी. सरदार किशनसिंहांना याचा सुगावा लागताच त्यांनी अजितसिंहांना तत्काळ भारत सोडून विदेशात जाण्यास सांगितले, त्यानंतर काही दिवसातच लागोपाठ २२ खटले 'भारतमाता सोसायटीवर' भरण्यात आले.

कराचीमधून बोटीने इराणी बंदर बुशेर येथे ते पोहोचले. त्यांच्या समवेत जिया उल हक व सूफी अंबाप्रसाद हे होते. इराणमध्ये अजितसिंहांनी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचे व इराणी हित यांचे समर्थन करणारे महातफ नावाने समाचारपत्र फारसीतले व्य इराणवर इंग्रजांचा प्रभाव होता. त्यामुळे दिवसेंदिवस इराणमध्ये राहणे धोकादायक बनले. इराण सोडून तुर्कस्थानला पलायन करत असता सूफी अंगाप्रसाद मात्र पकडले गेले. त्यांना फाशीची शिक्षा देण्यात आली.

अजितसिंहांनी तुर्कस्थानात केमाल पाशाची भेट घेतली. तेथून ऑस्ट्रियाला व पुढे जर्मनीस कैसरला भेटले. तेथेच त्यांनी सर्वप्रथम 'आझाद हिंद लष्करने' संगठन केले. हीच पुढे 'आझाद हिंद सेना' म्हणून प्रसिद्ध झाली.

सरदार अजितसिंह स्वित्झर्लंड येथे आले त्यावेळी स्वित्झर्लंड म्हणजे जगभरातील क्रांतिकारकांना अड्डा होता. तेथेच त्यांची लेनिन व मुसोलिनीशी भेट झाली. त्यावेळी मुसोलिनी विद्यार्थीदशेत होते.

***

**त्रैमासिक कर्नाळा क्रांतिपुष्प अकरावे मधील प्रकाशित लेख साभार.**



# हुतात्मा मदनलाल धिंग्रा

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या क्रांतीकारी संप्रदायातील एक अग्रगण्य क्रांतीकारक हुतात्मा मदनलाल धिंग्रा यांचा जन्मदिन.

जन्म. १८ सप्टेंबर १८८३

भारतीय स्वातंत्र्य-चळवळीतील एक थोर हुतात्मा. त्यांचा जन्म अमृतसर येथे उच्च मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांचे वडील एक ख्यातनाम डॉक्टर होते आणि बंधू बॅरिस्टर होते. मदनलालांचे शिक्षण अमृतसरला झाले. ते पंजाब विद्यापीठातून बी. ए. झाले व १९०६ मध्ये उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. त्यापुढील महिन्यात स्वातंत्र्यवीर सावरकरही लंडनला पोहचले. धिंग्रांचा परिचय सावरकरांशी होऊन ते सावरकरांच्या क्रांतीकार्यात सामील झाले. १८५७ च्या स्वातंत्र्यसमराचा सुवर्ण महोत्सव सावरकरांच्या प्रेरणेने लंडनमध्ये साजरा झाला. या महोत्सवाच्या निमित्ताने बनवलेल्या मवीरस्मृती मुद्राफ ( बॅज ) अभिमानाने कोटावर लावून धिंग्रा महाविद्यालयात गेले. तेथे एका इंग्रजाने ती मुद्रा कोटावरून हिसकावताच ते त्याच्या अंगावर सुरा घेऊन धावून गेले. क्रांतीकारकांचे आश्रयस्थान बनलेल्या 'भारत भवन' ('इंडिया हाऊस') मध्ये एक दिवस बाँबसंबंधीचे एक रसायन काचेच्या भांड्यात उकळत होते. हे भांडे तात्काळ

खाली उतरवले नाही, तर स्फोट अटळ आहे , हे लक्षात येताच धिंग्रांनी ते भांडे केवळ हातांनी घट्ट धरून खाली उतरवले. त्यात त्यांच्या हातांची कातडी भाजून पोळून निघाली, तरीही त्यांनी हूं कि चूं केले नाही ! अन्य एका प्रसंगी महिंदूही खूप शूर आहेतफ, हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी एक टाचणी आपला तळहात उपडा ठेवून त्यात आरपार टोचून घेतली !

११ ऑगस्ट १९०८ ला खुदीराम बोस आणि पुढे कन्हैयालाल दत्त व सत्येंद्रनाथ बोस फाशी गेले, तेव्हा धिंग्रा कृतीसाठी अधीर झाले. त्यांनी स्वा. सावरकरांना गंभीरपणे विचारले, हौतात्म्य गाजवण्याची वेळ आली आहे काय? यावर सावरकरांनी त्यांना विख्यात उत्तर दिले, एखाद्या हुतात्म्याचा तसा निश्चय झाला असेल आणि तो सिद्ध असेल, तर हौतात्म्याची वेळ आली असलीच पाहिजे! यानंतर हिंदुस्थानासंबंधीच्या मंत्रालयात काम करणाऱ्या आणि लंडनमध्ये आलेल्या हिंदी विद्यार्थ्यांना त्रास देणाऱ्या कर्झन वायलीचा वध करण्याचे निश्चित झाले.

त्यासाठी धिंग्रांनी 'रिव्हॉल्वर' बाळगण्याची अनुज्ञा काढली. ते कसे चालवायचे, ते शिकवणाऱ्या वर्गात प्रवेश घेऊन लवकरच त्यांनी अठरा फुटांवरील लक्ष्यही अचूकपणे टिपण्यात प्राविण्य मिळवले. याच काळात सावरकरांचे थोरले बंधू बाबाराव यांना चार कविता प्रसिद्ध केल्या म्हणून हिंदुस्थानात अटक करण्यात आली. स्वा. सावरकरांनाही बॅरिस्टरची सनद नाकारण्यात आली. आता या घटनांचा प्रतिशोध घेण्यासाठी धिंग्रा दिवस शोधू लागले.

१ जुलै १९०९ ला लंडनमध्ये नॅशनल इंडियन असोसिएशन या संस्थेचा वार्षिक समारंभ आयोजित करण्यात आला होता. ही संस्था इंग्लंडमध्ये आलेल्या हिंदी तरुणांना राजनिष्ठा शिकवण्याचा प्रयत्न करत असे. या समारंभाला धिंग्रांनी जायचे ठरवले. त्या सायंकाळी काळ्या रंगाचा साधाच सूट त्यांनी अंगावर चढवला. दोन भरलेली रिव्हॉल्व्हरे आणि एक जांबिया त्यांनी खिशात टाकला.

सोनेरी कडांचा चष्मा डोळ्यांना लावून, निळसर आकाशी रंगाची पंजाबी पगडी घालून ते समारंभाच्या स्थळी पोहचले. कर्झन वायली या संस्थेचा कोषाध्यक्षही होता. धिंग्रांनी आधीपासूनच त्याचा स्नेह संपादन केला होता.

रात्री ११ वाजता समारंभ आटोपून सर्व मंडळी घरोघरी निघाली. कर्झन वायलीही दाराकडे जात होता, तेव्हा धिंग्रा पुढे आले. ते दोघे जण बोलत बोलत सभागृहाच्या मुख्य दरवाजाबाहेर (पहिला मजला) आले. धिंग्रा मुद्दाम हळू आवाजात बोलू लागले. ते बोलणे ऐकण्यासाठी कर्झन वायलीने आपला उजवा कान धिंग्रांच्या तोंडाजवळ नेला. क्षणाचाही विलंब न लावता धिंग्रांनी वायलीच्या मुद्रेवर नेम धरून दोन गोळ्या झाडल्या. वायली कोलमडत दोन-चार हात मागे गेला, तोच धिंग्रांनी आणखी दोन गोळ्या झाडल्या. झुकांड्या खात कर्झन वायली भूमीवर निश्चेष्ट पडला !

२३ जुलैला धिंग्रांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. १७ ऑगस्ट १९०९ ला धिंग्रांना फाशी देण्यात आले. त्यांचा मृतदेहसुद्धा अग्नीसंस्कारासाठी मित्रांना न देता पेंटनव्हील कारागृहातच पुरण्यात आला. आई-वडील, पत्नी व मुलगा यांना हिंदुस्थानातच सोडून आलेल्या धिंग्रांचे या वेळी वय होते फक्त २५ वर्षे ! इंग्लंडच्या राजधानीत एका उच्चपदस्थ इंग्रजाला कंठस्नान घालणाऱ्या हिंदुस्थानच्या या क्रांतीकारकाला शतशः प्रणाम !

मृत्यूपूर्वी त्यांनी केलेले निवेदन आज वाचायलाच हवे. मदनलाल धिंग्रा म्हणाले: "My only prayer to God is that I may be re-born of the same mother and I may re-die in the same sacred cause till the cause is successful. Vande Mataram!"

**त्रैमासिक कर्नाळा क्रांतिपुष्प अकरावे मधील प्रकाशित लेख साभार.**

# पंजाब केसरी लाला लजपतराय



पंजाब केसरी लाला लजपतराय यांचा जन्म २८ जानेवारी १८३६ रोजी मुक्काम धुडीके पंजाब (ब्रिटीश) येथे झाला. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील जहाल मतवादी नेते म्हणून त्यांचे फार मोठे योगदान होते. अखिल भारतीय काँग्रेस, हिंदू महासभा, आर्यसमाज चळवळीतून त्यांनी कार्य केले. तसेच त्यांनी पंजाब नॅशनल बँकेची स्थापना केली.

त्यांचे वडिल मुनशी राधाकृष्ण अग्रवाल व आई गुलाबदेवी.

लाला लजपत राय यांचे वडील सरकारी शाळेत उर्दु आणि पर्शियनचे शिक्षक होते. वयाच्या तेराव्या वर्षी लालाजींचा विवाह राधादेवी यांच्याशी झाला. लालाजींच्या वडिलांची बदली रेवरी येथे झाली, त्यामुळे लालाजींचे उच्च माध्यमिक शिक्षण रेवरी येथे झाले.

१८८० साली लाहोर येथील सरकारी महाविद्यालयात त्यांनी कायद्याच्या अभ्यासासाठी प्रवेश घेतला. येथेच त्यांना देशभक्त लाला हंसराज आणि पंडित गुरुदत्त हे भेटले. यासोबतच लाहोर येथे शिक्षण घेत असताना स्वामी दयानंद सरस्वती यांच्या हिंदू सुधारणा चळवळीचा त्यांच्यावर प्रभाव पडला व ते आर्य समाजाचे सदस्य झाले. याच बरोबर ते लाहोरच्या आर्य गॅझेटचे संस्थापक व संपादक बनले.नंतर हिंदुत्वावरील दृढ श्रद्धेने ते हिंदुमहासभेचे सक्रिय सदस्य बनले. भारतीय उपखंडातील हिंदू जीवनपद्धतीवर लक्षपूर्वक काम करीत असताना त्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत शांतता मार्गाने आंदोलने केली. १८८४ साली त्यांच्या वडिलांची बदली लाहोरहून रोहटक येथे झाली तेव्हा ते रोहतकला आले व तेथून १८८० साली वडिलांची बदली हिस्सार येथे झाली तसे तेही हिस्सारला आले व तेथे त्यांनी आपला वकिली व्यवसाय सुरू केला. आपले

सहकारी बाबू चूडामणी यांसह लाला लाजपत रॉय हिस्सारच्या बार कौन्सिलचे संस्थापक सदस्य बनले. येथेच रॉय यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची हिस्सार शाखा स्थापन केली. याच बरोबर आर्यसमाजी मित्र बाबू चुडामणी, चंदुलाल तयाल, हरिदास तयाल, बालमुकूंद तयाल, डॉ. रामजी लाल हुंडा, पं. मुरारी लाल, शेठ छाजूराम जाट आणि देवराज संघीर यांना बरोबर घेऊन आर्य समाजाची स्थापना केली.

सन१८८८/८९ मध्ये काँग्रेसच्या अलाहाबाद वार्षिक अधिवेशनात त्यांनी हिस्सार जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले. लालाजी लाहोरच्या उच्च न्यायालयात वकिली करण्यासाठी १८९२ साली गेले. या काळात ते अनेक वृत्तपत्रातून ते लेखनही करीत असत.

१९०७ साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये सहभागी होऊन त्यांनी पंजाबमध्ये राजकीय निदर्शने केल्यामुळे ब्रिटिश राजसत्तेने त्यांच्यावर कोणताही खटला न चालवता त्यांना मंडालेच्या तुरुंगात धाडले. मात्र कोणताही सबळ पुरावा नसल्यामुळे पुन्हा नोव्हेंबर महिन्यात परत आणण्यात आले.

१९४७ च्या फाळणीनंतर ज्या विद्यालयाचे नामांतर इस्लामिया कॉलेज लाहोर असे करण्यांत आले त्या मुळ महाविद्यालय दयानंद एँग्लो-वैदिक स्कूल लाहोरची स्थापना लाला लजपतराय व महात्मा हंसराज यांनी १८८६ साली केली होती.

लालाजींनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात भाग घेण्यासाठी विदेशात जाण्याचा निर्णय घेतला व १९१४ साली वकीलीचा व्यवसाय सोडून ते ब्रिटनला गेले व तेथून १९१७ साली अमेरिकेला जाऊन ऑक्टोबरमध्ये न्यूयॉर्कला भारतीय हॉमरूल लीग स्थापन केली.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस १९२० च्या कलकत्ता अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून लालाजी निवडून आले, १९२१ साली त्यांनी लाहोर येथे लोकसेवक मंडळ या कल्याणकारी संघटनेची स्थापना केली.

**सायमन कमिशन**

ब्रिटिश सरकारने १९२८ साली सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय राजकीय परिस्थितीबद्दलची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी आयोग स्थापन केला होता. मात्र या आयोगामध्ये एकही भारतीय व्यक्ती नव्हती. त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांनी या आयोगावर बहिष्कार घातला. या विरोधात निदर्शने केली. ३० ऑक्टोबर १९२८ रोजी सायमन कमिशन लाहोरला आले होते. तेव्हा त्याविरोधात लाला लजपतराय यांनी तीव्र निदर्शने केली. यावेळी पोलीस अधीक्षक जेम्स स्कॉट यांने जमावासमोर भाषण करीत असलेल्या लालाजींच्या शरीरावर लाठीहल्ला केला. यावेळी लालाजी गरजले की, आज मी ज्या लाठ्या खाल्ल्या त्या म्हणजे ब्रिटिश सरकारच्या भारतातील राजवटीच्या शेवपेटीवरील खिळे ठरतील असे मी जाहीर करतो. लालाजींना पोलिसांनी अमानुष मारहाण केली यामुळेच त्यांना दिनांक १७ नोव्हेंबर १९२८ रोजी वीर मरण आले. मात्र डॉक्टरांनी लालाजींना हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू आल्याचे जाहीर केले.

लालाजींच्यावर झालेल्या या हल्याचा बदला क्रांतिवीर भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, चंद्रशेखर आझाद यांनी दिनांक १७ डिसेंबर १९२८ रोजी लाहोरच्या पोलीस मुख्यालयातून बाहेर पडणाऱ्या सॉंडर्सवर गोळ्या घालून घेतला.

**लेखक : डॉ.चंद्रकांत शहासने (देशभक्तकोशकार)**

**मो. ९८८१३७३५८५**

***

**त्रैमासिक कर्नाळा क्रांतिपुष्प अकरावे मधील प्रकाशित लेख साभार.**



# हुतात्मा भास्कर पांडुरंग कर्णिक.

**आत्मार्पण दिन ३१ जाने १९४३**

दिनांक २४ जानेवारी १९४३ रोजी रात्री साडेनऊ वाजता पुणे कँटोन्मेंट भागातील कॅपिटॉल आणि वेस्ट एण्ड चित्रपटगृहात बॉम्बस्फोट घडविण्यात आले .यात ३ इंग्रज अधिकारी ठार झाले, १४ जण जखमी झाले.

स्फोटातील बॉम्बच्या तुकड्यांचे निरीक्षण केल्यानंतर बॉम्ब देहूरोडच्या फॅक्टरीमधील असल्याचे समजले यावरून क्रांतिवीर भास्कर कर्णिक यास साथीदारांसह ३१ जानेवारी १९४३ रोजी पकडले.

रत्नागिरी जिल्ह्यात( सद्याचा सिंधुदुर्ग) करूळ या गावी भास्कर पांडुरंग कर्णिक यांचा जन्म ७ डिसेंबर १९१३ रोजी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण करूळ या गावी झाले. वयाच्या १०/१२ व्या वर्षी त्यांना माध्यमिक शिक्षणासाठी कर्नाटकातील गुलबर्ग्याला जावे लागले .पुढे त्यांनी मुंबई विद्यापीठाची बी.एस्सी. ची पदवी प्राप्त केली. १९४२ साली ते पुण्याच्या देहूरोड ॲम्युनिशन फॅक्टरीत नोकरी करू लागले.

१९४२ साली ब्रिटीश्यांविरोधात चळवळींनी जोर धरला होता. भूमिगत कारवायां करणारी अनेक मंडळी कार्यान्वित होती. भास्कर कर्णिक यांचाही तरुणांचा एक गट स्फोटकांच्या शोधात होता. कर्णिक स्वतः ऍमिनेशन फॅक्टरीमध्ये नोकरीस होते, त्यामुळे त्यांनी दररोज जेवणाच्या डब्यातून बॉम्ब चोरण्यास सुरुवात केली. अशाप्रकारे अनेक बॉम्बचा साठा त्यांनी करून ठेवला होता तो पोलिसांनी तपासात जप्त केला.

या बॉम्बपैकी काही बॉम्ब पुणे कॅन्टॉन्मेन्टमधील कॅपिटॉल चित्रपटगृहातील स्फोटात वापरण्यात आले. बॉम्ब टाकण्याच्या कटात सामील असलेले अन्य क्रांतिकारक बापू साळवी, बाबूराव चव्हाण, एस.टी. कुलकर्णी, रामसिंग, दत्ता जोशी आणि हरिभाऊ लिमये अशा सहाजणांना पकडून जेलमध्ये टाकले होते., पैकी दत्ता जोशी यास जेलमध्येच वीरमरण आले.,

**पुणे, फरासखान्यात भास्कर कर्णिक यांना वीरमरण**

कॅपिटॉल थिएटरमध्ये सापडलेल्या बॉम्बच्या अवशेषांवरून हे बॉम्ब कोठून आले याचा शोध पोलिसांनी घेतला, आणि त्यांनी भास्कर पांडुरंग कर्णिक, भालचंद्र दामोदर बेंद्रे, अनंत आगाशे, वामन कुलकर्णी आणि रामचंद्र तेलंग या पाच जणांना पकडून पुण्याच्या फरासखाना पोलीस चौकीत आणले.

तेव्हा कटाचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागलेले पाहून क्रांतिवीर भास्करराव कर्णिक लघुशंकेच्या निमित्ताने किंचित दूर गेले आणि त्यांनी खिशातली सायनाईडची पूड खाल्ली. आणि काही सेकंदात त्यांना वीरमरण आले. कॅपिटॉल बॉम्ब खटल्यातील मुख्य दुवा अशाप्रकारे नाहीसा झाला त्यामुळे पोलिसांची निराशा झाली.

कर्णिकांच्या आत्मार्पणामुळे मोठ्या संख्येने क्रांतिकारक वाचले.असे होते हे धाडसी करूळ, सिंधुदुर्गचे सुपुत्र हुतात्मा भास्कर पांडुरंग कर्णिक.!

पुणे येथील श्रीमंत दगडूशेठ हलवाई मंदिराच्या अलिकडे मजूर अड्डयाजवळ हुतात्मा भास्कर पांडुरंग कर्णिक यांच्या नावे एक स्मृतीस्तंभ उभारलेला आहे. तसेच कणकवली करुळ या गावी हुतात्मा भास्कर कर्णिक यांच्या नावे हुतात्मा स्मारक उभारलेले आहे

**लेखक : डॉ. चंद्रकांत शहासने देशभक्तकोशकार.**

**मो.९८८१३७३५८५**

***

**त्रैमासिक कर्नाळा क्रांतिपुष्प अकरावे मधील प्रकाशित लेख साभार.**

# नेताजी सुभाषचंद्र बोस



दिनांक २३ जानेवारी हा नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जयंतीदिन आहे. नेताजींच्या कर्तृत्वाचा दाखला म्हणजे अंदमान. २१ ऑक्टोबर १९४३ रोजी सुभाषबाबूंनी स्वतंत्र भारताची स्थापना केली. (भारताच्या स्वातंत्र्यापूर्वी चार वर्षे) ही स्थापना सिंगापूरला झाली. सुभाषबाबूंनी आपले मंत्री मंडळ नेमले. यामध्ये ते स्वतः राष्ट्रपती, पंतप्रधान, संरक्षण मंत्री व सरसेनानी झाले. या स्वतंत्र भारताच्या घोषणेला इटली, जर्मनी, ब्रह्मदेश, चीन, जपान या देशांनी मान्यता दिली होती. नेताजींनी जाहीर केलेल्या स्वतंत्र भारताने अमेरिका, इंग्लंड यांचेविरुद्ध युद्ध जाहीर केले. ब्रिटिश हिंदुस्थानचे अंदमान बेट ब्रिटिशांकडून जपानने जिंकून घेतले व सुभाषबाबूंना भारताच्या राजधानी करीता भेट दिले. अशाप्रकारे सुभाषबाबूंनी जाहीर केलेल्या स्वतंत्र भारताची राजधानी सिंगापूरहून अंदमानला आली. ही घटना ६ नोव्हेंबर १९४३ रोजी घडली.

३१ डिसेंबर १९४३ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी अंदमानच्या भूमीत पदार्पण केले. स्वतंत्र भारताच्या फौजा ब्रह्मदेशातून पारतंत्र्यात असलेल्या ब्रिटीश हिंदुस्थानवर चालून आल्या. सुभाषबाबूंच्या सैन्यात ३०,००० सैनिक होते. सुभाषबाबूंची सेना आजाद हिंद सेना या नावाने ओळखली जात होती. १८ मार्च १९४३ रोजी आक्रमण करण्यात आले. वास्तविक पाहता यावेळेला पारतंत्र्यात असलेल्या भारतातून स्वातंत्र्याचा जयघोष होणे गरजेचे होते, पण तसे काही घडले नाही. याचे कारण अनेक हिंदी पुढारी तुरुंगात होते आणि काहीजण फक्त स्वातंत्र्याच्या गप्पा मारीत होते. निष्प्रभ होते. मग बंड कोण करणार?

आझाद हिंद सेनेचे सर्व सैनिक आठ सरहद्दींवर लढत होते. इंफाळ आणि कोहिमा येथे घनघोर युद्ध झाले. इम्फाळ आझाद हिंद सेनेच्या ताब्यात येण्याच्या बेतात असतानाच ब्रिटिशांनी हवाईमार्गे आक्रमण केले. सुभाष बाबूंकडे हवाई फौजा नव्हत्या. परिणामी हिंदी फौजा रंगूनपर्यंत मागे गेल्या. अभिमानाची गोष्ट अशी की आजाद हिंद सेनेचा एकही सैनिक ब्रिटिशांना शरण गेला नाही. यावेळी नेताजी रंगूनला होते. तेथे राहणे धोक्याचे होते म्हणून ते हवाईमार्गे निघाले पण दुर्दैवाने विमानात अपघात झाला. १८ ऑगस्ट १९४५ रोजी त्यांना वीरमरण आले. वंदे मातरम्!

****

**त्रैमासिक कर्नाळा क्रांतिपुष्प अकरावे मधील प्रकाशित लेख साभार.**